## Indian Academy of Pediatrics (IAP)

**महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ज्ञ संघटना (MAHAIAP)**

## प्रकरण ७५ :

# मेंदूचा पक्षाघात असलेल्या मुलाची घरी घ्यावयाची काळजी

मेंदूचा पक्षाघात म्हणजेच सेलिब्रल पाल्सी यात मेंदूशी निगडित कारणांमुळे मांसपेशींमधील कमजोरी किंवा समस्या होत असते. याची व्याप्ती ही हातापायावरचे नियंत्रण, झटके, दृष्टीदोष, बहिरेपणा आणि वर्तणुकीतल्या समस्या अशा अनेक पातळ्यांवर असल्यामुळे पालकांना आयुष्यभर त्या मुलाची काळजी घ्यावी लागते. आज आपण चर्चेद्वारे पालकांनी याबाबतीत काय करता येतं हे पाहणार आहोत.


अध्यक्ष २०२३ : डॉ. रमाकांत पाटील

सचिव २०२२-२३ : डॉ. अमोल पवार

अध्यक्ष २०२२ : डॉ. हेमंत गन्गोलीया

मार्गदर्शक : डॉ. जयंत उपाध्ये

समन्वयक : डॉ. नरेंद्र नानिवडेकर

अनुवादक : डॉ. जयंत पांढरीकर

पुनरावलोकन : डॉ. नरेंद्र नानिवडेकर, उज्ज्वल करमळकर

*Convener:* **Vishal Sondhi**

*Members:* **Ruchika Jha, Anil Shriram Raut, Rashmi Gupta, Vasant M Khalatkar**

*Reviewer:* **Sanjay Niranjan**




**मेंदूचा पक्षाघात असलेल्या मुलाची घरी घ्यावयाची काळजी याविषयी वारंवार विचारले जाणारे दहा प्रश्न.**

१ सेरेब्रलपाल्सी म्हणजेच मेंदूचा पक्षाघात म्हणजे काय ?

२ मेंदूचा पक्षाघात कशामुळे होतो ?

३ मेंदूच्या पक्षाघाताची लक्षणे काय ? त्यासोबत असणाऱ्या इतर कोणत्या समस्या आहेत ?

४ मेंदूच्या पक्षाघाताचे निदान करण्याकरिता कुठल्या तपासण्या कराव्या लागतात ?

५ माझा मुलगा हा व्यवस्थित खाऊ का शकत नाही ?

६ माझ्या अशा मुलाचा तोंडातून लाळ सतत गळते, त्याकरता मी काय करू शकेन ?

७ माझा असा मुलगा नियमितपणे शौचाला जात नाही, मी काय करू शकेन ?

८ मेंदूचा पक्षाघात हा पूर्णपणे बरा होऊ शकतो का ? त्याला कुठल्या औषधांची आवश्यकता आहे ?

९ माझ्या अशा मुलाचे पुढे काय भवितव्य आहे ? तो स्वतःच्या पायावर उभा राहू शकेल ? बसू शकेल की नाही ?

१० माझा दुसरा होणारा मुलगी/मुलगाही असाच होईल का आणि तो तसा होऊ नये म्हणून मी काय काळजी घ्यायला हवी ?


**Under the Auspices of the IAP Action Plan 2021–2022**

**Piyush Gupta** IAP President 2021

**Remesh Kumar R** IAP President-Elect 2021

**Bakul Parekh** IAP President 2020

**GV Basavaraja** IAP HSG 2020–2021

**Deepak Ugra** National Co-ordinator

© Indian Academy of Pediatrics

## IAP Parent Guideline Committee

**Chairpersons:** Piyush Gupta, Bakul Parekh
**IAP Co-ordinators:** GV Basavaraja, Harish Kumar Pemde, Purna Kurkure

### Core Group

*National Co-ordinator:* ***Deepak Ugra***
*Member Secretaries:* ***Upendra Kinjawadekar, Samir Dalwai***
*Members:* ***Apurba Ghosh, CP Bansal, Santosh Soans, Somashekhar Nimbalkar, S Sitaraman***

75

# मेंदूचा पक्षाघात असलेल्या मुलाची घरी घ्यावयाची काळजी

प्रश्न (१)

## सेरेब्रलपाल्सी म्हणजेच मेंदूचा पक्षघात म्हणजे काय?

सेरेब्रलपाल्सी अर्थातच मेंदूचा पक्षघात याला थोडक्यात सीपी किंवा स्पास्टीक मुलगा असं संबोधलं जातं, हा एक अशा आजारांचा समूह आहे ज्यामध्ये व्यक्तीची हालचाल करण्याची, संतुलन राखण्याची किंवा दैनंदिन जीवनातील गोष्टी करण्याची क्षमता बाधित होते. सेरेब्रल म्हणजे मेंदूशी निगडित आणि पाल्सी म्हणजे मांसपेशींमधील कमजोरी किंवा समस्या. सोप्या शब्दात सांगायचे तर मेंदूचा पक्षाघात हा मेंदूमध्ये वाढ होत असताना अडथळा आल्याने किंवा इजा झाल्याने होतो. ज्यामध्ये मुलाचे मेंदूच्या मांसपेशींवरील असलेले नियंत्रण बाधित होते. मेंदूच्या इजेमुळे होणाऱ्या मेंदूच्या पक्षाघातामध्ये त्यासोबतच झटके येणे, दृष्टीदोष होणे किंवा बहिरेपणा येणे अशाप्रकारच्या गोष्टीही होऊ शकतात. तसेच बुद्धिमत्तेमध्ये दोष असणे किंवा वर्तुणुक समस्यादेखील येऊ शकतात. मेंदूच्या पक्षाघाताची लक्षणे अनेक आहेत आणि ती प्रत्येक मुलापरत्वे वेगवेगळी असू शकतात. आणि ही लक्षणे मेंदूला किती प्रमाणात आघात पोहोचला आहे त्याचप्रमाणे सोबतच काही आणखी त्रास आहे का किंवा काही गुंतागुंत झाली आहे का यावर अवलंबून असतात. हा आजार वयानुसार वाढत जात नाही किंवा बिघडत नाही वयापरत्वे त्याची लक्षणे बदलू शकतील. अर्थात हे त्या मेंदूच्या वाढीनुसार आणि डॉक्टरांच्या इलाजानुसार बदलू शकेल.

प्रश्न (२)

## मेंदूचा पक्षाघात कशामुळे होतो?

मेंदूची वाढ होत असताना काही आघात झाल्याने किंवा वाढत्या मेंदूला इजा झाल्यामुळे मेंदूचा पक्षघात होतो आणि हे अनेक कारणांमुळे होऊ शकते. साधारण ८०% कारणे ही मुलाच्या जन्माच्या अगोदर होऊ शकतात, दहा टक्के मुलांमध्ये जन्माच्या वेळेला अपघात झाल्याने होऊ शकते तर दहा टक्के मुलांमध्ये प्रथम काही वर्षांमध्ये मेंदूला इजा झाल्यामुळे होऊ शकतात.

**जन्मा अगोदर झालेल्या अपघातांमुळे होणारी कारणे**

- मेंदूच्या वाढीतील होणारे दोष साधारण दहा टक्के मुलांमध्ये याप्रमाणे आढळून येतात.
- आईकडून होणारी कारणे : आईचा आहार असंतुलित व कनिष्ठ दर्जाचा असणे. आईला होणारे संसर्गजन्य आजार जे वार प्लासेंटामार्फत गर्भापर्यंत पोहोचतात. अनियंत्रित उच्च रक्तदाब, एक्लाम्पशिया, औषधींचा वापर, झटक्यांमध्ये वापरली जाणारी औषधे, दारूचे सेवन, धूम्रपान किंवा कोकेन व निकोटीनचे सेवन यामुळे होणाऱ्या मुलाला मेंदूचा पक्षाघात होऊ शकतो.
- जनुकीयकारणे : कुटुंबामध्ये पूर्वी कोणाला मेंदूचा पक्षघात झाला असेल तर आई –वडिलांचे लग्नापूर्वी रक्ताचे नाते असेल तर किंवा सोबतच आणखीन इतर कुठल्या अवयवात काही जन्मजात दोष असतील तर.
- प्लासेंटा अर्थातच वारेशी असलेली संबंधित कारणे : गर्भाशयातील वारेमधून गर्भाला होणारा अत्यल्प रक्तपुरवठा ज्यामूळे गर्भात बाळाची वाढ होत नाही आणि हे बाळ कमी वजनांचे असते. अशा बाळांना मेंदूचा पक्षाघात होण्याची शक्यता असू शकते.
- अनेक गर्भधारणा : एकापेक्षा अनेक गर्भ उदा: जुळे किंवा तिळे असल्यास मेंदूचा पक्षघात होण्याची शक्यता थोडी जास्त राहते.
- गर्भधारणेचे वय : प्रीमॅच्युरिटी अर्थात कमी दिवसांचे बाळ यामध्ये मेंदूचा पक्षघात होण्याचे प्रमाण हे दहा टक्के जास्त असते, विशेषतः ज्यांचे गर्भधारणेचे वय जन्माच्यावेळी २८ आठवड्यांपेक्षा कमी असते, त्यांना मेंदूचा पक्षघात होण्याची शक्यता जास्त असते.

**बाळाच्या जन्माच्यावेळी होणारे आघात.....**

- प्रसूतीवेळेस होणारा उशीर किंवा गुंतागुंतीची प्रसूती.
- जन्माच्या अगोदर जन्मनलिकेतून होणारा अतिरक्तस्त्राव किंवा गर्भाशयात बाळाच्या गर्भातील ह्रदयांच्या ठोक्याचा गतिदोष.
- तातडीने सिझेरियन ऑपरेशन करून बाळाचा जन्म करावा लागल्यास आणि बाळाने आईच्या पोटात शी केल्यास

**बाळाचा जन्म झाल्यानंतर लगेचच होणारे काही आघात......**

- बाळाची रक्तशर्करा कमी होणे त्यामुळे बाळाच्या मेंदूवर परिणाम होऊन त्याला मेंदूचा पक्षाघात होऊ शकतो.
- जे मेंदूला इजा करू शकेल असे संसर्गजन्य आजार जन्मतःच होणे, त्याला मेंदुज्वर असे म्हणतात.
- मुलाला कावीळ झाली असल्यास बिलीरुबिनचे प्रमाण खूप वाढणे ज्यामुळे मेंदूला धक्का पोहोचू शकेल. मेंदूमध्ये रक्तस्त्राव होणे किंवा रक्तगाठ दोष होणे ज्यामुळे रक्तवाहिन्या मेंदूला रक्तपुरवठा करू शकत नाहीत.

**बाळाला प्रथम काही वर्षात होणारे आघात :**

मेंदूचे संसर्गजन्य मेनिंजायटीस (मेंदूच्या आवरणाची सूज) किंवा एनकेफलाइटिस (मेंदूला आलेली सूज) किंवा ज्यामध्ये वयाच्या दोन वर्षेपर्यंत मेंदूला ऑक्सिजनचा पुरवठा होत नाही अशी कुठलीही घटना. झटक्यामध्ये मेंदूला इजा झाल्यामुळे, असे खूपवेळ चढणारे झटके असो की धोकादायक घटना असो उदा: पाण्यात बुडणे इत्यादी ह्यामुळे मेंदूचा पक्षाघात होऊ शकतो.

प्रश्न
(३)

## मेंदूच्या पक्षघाताची लक्षणे काय? त्यासोबत आणखीन कुठल्या समस्या राहू शकतात?

मेंदूच्या पक्षघाताची लक्षणेही तो कुठल्या प्रकारचा आहे आणि मेंदूला किती जास्त प्रमाणात इजा पोहोचली आहे यावर अवलंबून असतात. मुलाच्या वाढत्या वयानुसार लक्षणे बदलू शकतात. त्याचप्रमाणे वाढत्या मेंदूच्या कार्यक्षमतेनुसार ही लक्षणे बदलू शकतात. साधारणपणे १८ ते २४ महिन्याचे असताना या आजाराचे निदान होते. जेव्हा पालक काही लक्षणे ओळखतात उदा; बाळ उशिराने बसायला लागले आहे, उशिराने, उभे राहायला लागले आहे किंवा उशिराने चालायला लागले आहे. परंतु नियमितपणे बालरोगतज्ञांकडे तपासणी केल्यास मेंदूच्या पक्षघाताचे निदान लवकर म्हणजे सहा ते नऊ महिन्यांपर्यंत करता येऊ शकते. जन्मापासून एक वर्षपर्यंत सुदृढ बालक तपासणी केंद्रात जर वेळोवेळी बाळांची तपासणी केल्यास मेंदूच्या पक्षाघाताचे निदान हे लवकर केले जाऊ शकते. तसंच त्यापासून होणारे दूरगामी दुष्परिणाम यालादेखील आळा घालता येऊ शकतो व लवकर इलाज करता येतो.

लवकर दिसणारी लक्षणे अगदी जन्मानंतर लगेच दिसणारे लक्षणे म्हणजे बाळाला स्तनपान करताना अडचणी येणे आणि बाळ वारंवार प्यायलेले दूध काढून टाकणे/ओकणे. बाळ चिडचिडे होणे, अस्वस्थ झोप असणे शरीरामध्ये अवाजवी ताठरता असणे किंवा लूळेपणा असणे ज्यामुळे बाळाला व्यवस्थित पकडता येत नाही. बाळ खेळण्याकडे किंवा चेहऱ्याकडे व्यवस्थित बघू शकत नाही. जेव्हा सहा महिन्यांपेक्षा लहान आहे त्यामध्ये मुख्य लक्षण म्हणजे ते बाळ आपले डोके धरू शकत नाही जेव्हा आपण  त्याचा प्रयत्न करतो अशावेळेसमान व पाठही मागे जाते तेव्हा पालकांना असं वाटतं की बाळ त्यांना दूर ठेवतो आहे किंवा बाळाला उभे धरल्यास त्याचे दोन्ही पाय कात्रीसारखे आकडी परिस्थितीमध्ये राहतात आणि सर्वकाही त्याच्या मांसपेशींचा/नियंत्रण गेल्यामुळे होते ज्यामुळे मांसपेशींमध्ये ताठरता किंवा सैलता येते. आढळणारी लक्षणे ही सर्व लक्षणे एका समूहामध्ये ठेवल्यास त्यांना सकारात्मक म्हणता येईल ज्यामध्ये मांसपेशींची ताठरता वाढलेली असते आणि हे जेव्हा बाळाला आपण मालिश करतो किंवा त्याचे लंगोट बदलतो त्यावेळेस दिसून येते.

त्यासोबतच अनावश्यक हालचाली होणे, नकारात्मक लक्षणे, म्हणजे मांसपेशींची हालचाल कमी असणे किंवा मांसपेशीमध्ये थकवा जाणवतो आणि शारीरिक हालचाली या फार संथ असतात. तसेच दैनंदिन कार्य करण्यास संथपणा येणे, तसेच लहान मांसपेशी व कार्यक्षम असणे शरीराच्या विविध अंगामध्ये असे प्रकार होऊ शकतात जे मेंदूतील त्या त्या भागातील इजा दर्शवितात उदा; हात, पाय इत्यादी स्पास्टिक डायप्लेजियामध्ये दोन्ही पायात ताठरता असते परंतु हातांच्या हालचाली चांगल्या असतात. स्पास्टिक हेमीप्लेजियामध्ये शरीराच्या एका भागामध्ये अर्धांगवायू असतो तर क्वाड्रीप्लेजीयामध्ये दोन्ही हात व दोन्ही पाय हे ताठ असतात व ते अकार्यक्षम होतात तर  कायनेटिक मेंदूच्या पक्षाघातामध्ये अशा मुलांच्या अनैच्छिक हालचाली होत राहतात व त्यांची ढबही असामान्य असते.

सोबत असणाऱ्या समस्या.... यासोबतच हालचालींच्या व उभे राहाण्याची पद्धत म्हणजेच ढबेच्या समस्या असतात. तसेच शरीराचे इतर कार्यदेखील जे मांसपेशींनी व मांसपेशींच्या कार्याने नियंत्रित केले जातात, उदा; गिळणे, चावणे, खाणे, श्वास घेणे, संडास व लघवीवरील नियंत्रण इत्यादी कृतीदेखील बाधित होऊ शकतात

संडास व लघवीवरील नियंत्रण इत्यादी कृतीदेखील बाधित होऊ शकतात. मेंदूला होणाऱ्या इजेमुळे मेंदूचा पक्षघात झाल्यास मेंदूच्या इतर कार्यावरदेखील परिणाम होऊ शकतो  उदा; बुद्धिमत्ता, दृष्टी, ऐकणे, बोलणे, संवेदने सस्पर्श, लक्ष देणे किंवा वर्तणूक इत्यादी गोष्टींवरदेखील परिणाम होऊ शकतो.

- आहार व वाढ मेंदूचा पक्षाघात असलेल्या मुलांना चावण्यामध्ये व गिळण्यामध्ये समस्या निर्माण होतात. त्यामुळे त्यांना घास घेताना त्रास होऊन गुदमरण्याची शक्यता असते किंवा खोकल्यासारखे त्रास होऊ शकतो. सोबतच उलटीसारखी वासना खाल्ल्यानंतर होऊ शकते तसेच ॲसिड रिफलक्स म्हणजेच ॲसिडिटी, पोट दुखणे, मळमळ होणे, उलटी होणे इत्यादी आजारदेखील होऊ शकतात. या सर्व गोष्टींमुळे त्याचा खाण्याचा वेळ वाढतो आणि त्याला कुपोषण, जीवनसत्त्वांचे प्रमाण कमी असणे व वाढ खुंटणे हेदेखील होऊ शकते. वैद्यकीय उपचार केले तरीही जर खाण्याच्या समस्या राहिल्या तर अशा मुलांना नाकातून किंवा तोंडातून पोटामध्ये एक नळी टाकली जाते व त्यामधून अन्न दिले जाते. जेणेकरून त्यांना आहाराच्या समस्या निर्माण होणार नाहीत व त्यांचा आहार चांगला राहील.

- झटके येणे किंवा मिर्गीमेंदूचा पक्षाघात असलेल्या मुलांमध्ये साधारणपणे २४ ते ४५% मुलांमध्ये मिरगीचे प्रमाण आढळून येते. त्यामध्ये जर्किंगमोमेंट्स अर्थातच धक्कयाच्या हालचाली शरीरालासर्वत्रअसणे, शून्यात पाहणे इत्यादी. मिर्गी असणं हे आणखी संकट आहे जर ती औषध देऊन पण नियंत्रण करण्यात येत नसेल तर कारण त्यासाठी दिले जाणारे औषधांमुळे बरेचदा मुलगा झोपून राहतो व त्यामुळे त्याची सामाजिक वाढ खुंटते.
- बौद्धिक अपंगत्व हे जवळपास ५०% मुलांमध्ये आढळून येते. मज्जा वागणुकीच्या समस्या: मज्जासंस्था वाढीचा विकार मेंदूचा पक्षाघात असलेल्या रुग्णांना बरेचदा भावनिक आणि मानसिक वर्तणूक विकार आढळून येतात ज्यामध्ये लक्ष कालावधी हा खराब असतो, चिंता, ओसीडी आणि बरेचदा स्वमग्नतादेखील आढळून येते. ६) दृष्टीविकार: मेंदूचा पक्षाघात असलेल्या मुलांना बरेचदा दृष्टीदोष राहतो विशेषतः ते नजर एका ठिकाणी स्थिर करू शकत नाही आणि त्यांना डोळ्याच्या हालचाली करण्यात अडथळा येतो.
- बहिरेपणा किंवा ऐकण्याचा विकार: मेंदूचा पक्षाघात गेलेल्या मुलांपैकी दहा ते वीस टक्के मुलांमध्ये ऐकण्यासंदर्भात किंवा बहिरेपणाच्या समस्या राहतात. त्यातील पाच टक्के मुले बहिरे असतात. प्रथम तीन महिन्यांमध्ये जर निदान झाले आणि इलाज जर सहा महिन्याच्या आत सुरू झाला तर मात्र अशा मुलांमध्ये भाषा व शिक्षण विकसित होऊ शकते.
- बोलणे आणि संवाद साधण्यात समस्या येणे: मेंदूचा पक्षाघात गेलेल्या मुलांपैकी ४०% ते साठ टक्के मुलांमध्ये भाषा व संवाद साधण्याची तक्रार राहू शकते तर २५ % मुलांमध्ये ते मुळीच बोलू शकत नाहीत.
- लघवी व शौचावरील नियंत्रण: मांसपेशींवरील असणारे कमजोर नियंत्रण यामुळे शौच होणे व लघवी होणे या दोन्ही कृतींवर परिणाम होऊ शकतो. बद्धकोष्ठता हा एक फार मोठा त्रास मुलांना तसेच त्यांच्या पालकांना होतो ज्यामध्ये शौचास होण्यास त्रास होतो आणि अशी मुले संडास करताना खूप जोर लावतात व त्यांना कडक संडास होतं व ते खूप रडतात त्याचप्रमाणे मूत्राशयावरील नियंत्रणचा विकारदेखील अशा मुलांना होतो ज्यामध्ये ते पूर्णपणे लघवी करू शकत नाहीत किंवा त्यांना थोडी थोडी लघवी होत राहते किंवा त्यांना मूत्रमार्गाचा संसर्ग वारंवार होतो
- श्वासनलिकेच्या समस्या: श्वास घेण्याकरता उपयोगी पडणाऱ्या मांसपेशीवर परिणाम झाल्यास त्यांच्या हालचालीदेखील या अनियंत्रित होतात, सोबतच अन्नकण हे श्वासनलिकेत जाऊ शकतात त्यामुळे अशा मुलांना श्वसननलिकेचे फुफ्फुसाचे संसर्ग व आजार हे वारंवार होतात किंवा त्यांना दीर्घकालीन श्वसन विकार होऊ शकतो.
- हाडे व सांध्याशी निगडित समस्या: सगळ्यात वारंवार आढळून येणारी हाडे व सांध्याच्या समस्या म्हणजे स्कोलीओसीस यामध्ये पाठीचा कणा हा वाकडा होतो. पायाच्या विकृती, खुब्याचे हाड निखळणे ही विकृती, तसेच इतर सांध्यांच्याभोवती मांसपेशींचे आकुंचन पावणाच्या समस्या. ज्यामुळे ते सांधे कार्यरत राहू शकत नाहीत तसेच हाडातील ठिसूळपणा वाढून ती हाड मोडण्याची शक्यता जास्त वाढते.
- लाळ गळण्याचे प्रमाण अतिशय जास्त असते, त्याचे मुख्य कारण म्हणजे श्वास घेणाऱ्या मांसपेशी कमकुवत होतात. ज्यामुळे तोंडातील लाळ गिळणे शक्य होत नाही. तसेच अशा मुलांच्या तोंडाची काळजी, निगा नीट राखली नसल्याने तोंडातून सतत लाळ गळत राहते.
- सदोष झोप: मेंदूचा पक्षाघात गेलेल्या मुलांना नेहमीच शांत झोपण्यास अडथळा येतो. त्यामुळे ते बरेचदा रात्रभर जागे असतात आणि त्यांची झोपेची जी प्रत असते ती पण कमी दर्जाची असते. त्यामुळे त्यांना वर्तणूक समस्यांचे प्रमाण हे जास्त वाढतं आणि त्यामुळे दिवसाच्या वेळेला किंवा शिकताना त्यांना त्रास होतो.
- दुखणे: मेंदूचा पक्षाघात गेलेल्या ५० ते ७५ टक्के मुलांना कुठेतरी दुखत असतं परंतु ते व्यवस्थितपणे सांगू शकत नाहीत याची कारणे अनेक असू शकतात उदा; मांसपेशींची ताठरता, अनैच्छिक हालचाली, ॲसिडिटी, सांध्यांचे दुखणे किंवा बद्धकोष्ठता.

प्रश्न
(४)

## मेंदूचा पक्षाघात याचे निदान करण्याकरिता कुठल्या तपासण्या आहेत का?

मेंदूचा पक्षाघात याचे निदान केवळ पालकांनी सांगितलेल्या माहितीनुसार/ इतिहासानुसार आणि अगदी व्यवस्थित बाळाची तपासणी केले असता करता येतं. विशेषतः बाळ जेव्हा नेहमीच्या भेटी करता दवाखान्यात येते, त्यावेळेला काळजीपूर्वक तपासणी केली असता याचे निदान करता येते. निदानावर शिक्कामोर्तब करण्याकरता कुठल्याही तपासण्याची गरज नाही. परंतु त्याची कारणे काय आहेत हे जाणून घेण्याकरता मात्र तसेच सोबत काही आणखी आजार आहेत का हे जाणून घेण्याकरता तपासण्या कराव्या लागतात. या तपासण्यांमध्ये मेंदूचा एमआरआय, जनुकीय किंवा चयापचयाच्या संबंधित रक्ताच्या तपासण्या करणं गरजेचं असतं. तसेच रक्त गोठण्यासंदर्भात तपासण्या करणे आवश्यक असतं. ईईजी, म्हणजेच मेंदूचा आलेख म्हणजेच इलेक्ट्रोंईनसिफालोग्राम यामध्ये मेंदूतील विद्युत क्रिया कला तसेच मिर्गीबद्दल माहिती मिळते. ज्या मुलांना फिट्स किंवा मिर्गी येत असल्याची माहिती आहे त्या मुलांमध्येही तपासणी करण्यात येते. तसेच बरेच मुलांमध्ये अति सौम्य प्रकारचे झटके असतात जे कदाचित पालक ओळखू शकत नाहीत तेव्हा या तपासण्या केल्यावर ते ओळखले जाऊ शकतात.

**श्रवणाचे मूल्यांकन :**

मेंदूचा पक्षाघात असणाऱ्या दहा ते वीस टक्के मुलांमध्ये त्यासोबतच श्रवणाचे दोष असू शकतात. हा श्रवणदोष लवकर निदान झाल्यास आपण त्या मुलाची भाषा चांगल्याप्रकारे सुधारू शकतो.

**बोलणे संवाद कला :**

त्याची भाषा तसेच सज्ञानात्मक कौशल्य सुधारू शकतो सर्वच बाळांचे एक महिन्याचे असताना श्रवण मापन केले गेले पाहिजे. किंवा जे बाळ आजाराकरता भरती होते ते सुट्टी होण्यापूर्वी त्याचे श्रवण मापन केले गेलेच पाहिजे. अशा सर्व बाळांची एबीआर अर्थातच ऑडिओमेट्री ब्रेन स्टेम रिस्पॉन्स ही तपासणी केली गेली पाहिजे. तीन महिन्याच्या आत, बेरा ब्रेन स्टेम रिस्पॉन्स ऑडिओमेट्री आणि जर याआधी केली गेली नसेल तर करावी. सर्वच मेंदूचा पक्षाघात असलेल्या मुलांची दोन वर्षाच्या आत ती तपासणी केली गेली पाहिजे. जर असं जाणवलं की मुलांमध्ये श्रवणदोष आहे किंवा कुठल्याही आवाजाला ते बाळ प्रतिसाद देत नाही किंवा ते बाळ नीट बोलू शकत नाही किंवा कुठल्याही ओळखीच्या आवाजाकडे ते बाळ बघत नाही, तेव्हा ही तपासणी ताबडतोब केली गेली पाहिजे.

**दृष्टीचे मूल्यमापन :**

मेंदूचा पक्षाघात असणाऱ्या ३० टक्के मुलांमध्ये दृष्टीदोष असू शकतो. त्याचे प्रमाण ज्यामध्ये रिफ्रॅक्टिवईररर्स किंवा दृष्टीपटलदोष, मेंदूतील आंधळेपणा,

डोळ्यांचा तिरळेपणा  किंवा मोतीबिंदू असणे असू शकतो. नेत्र तपासणी मुख्यत्वे करून बाळ बघू शकतो आहे की नाही याकरिता करायला हवी आणि बघू शकत नसल्यास त्याची तीव्रता काय हे तपासण्याकरिता करायला हवे. एकंदरीतच नेत्रतपासणी ही कुठल्याही दुरुस्त होणाऱ्या आजाराचे निदान करण्याकरिता करणे गरजेचे असते. व्हीईपी... विच्युअल इफेक्ट पोटेन्शिअल नावाची तपासणी काही बाळांना सांगितली जाते त्यामध्ये मेंदूचा दृश्य प्रतिसाद कसा आहे हे तपासले

जाते. सर्वच कमी दिवसांच्या बाळांना आणि ज्यांना मेंदूचा पक्षाघात होण्याचा संभाव्य धोका असतो अशा मुलांची 'आर ओ पी टेस्टिंग' म्हणजेच रेटायनोपेथी ऑफप्रीमैचुरीटी तपासणी केली जाते.

**बुद्ध्यांक व वर्तनात्मक मूल्यांकन :**
मेंदूचा पक्षाघात असलेल्या ५० टक्के मुलांना बौद्धिक अपंगत्व आढळून येते. अर्थातच उर्वरित पन्नास मुलांची बुद्धीही सर्वसाधारण असते. बाळाच्या प्रत्येक तपासणी भेटी दरम्यान त्याची तपासणी चाचणीही त्याच्या वाढीसंदर्भात व एकंदरीत वाढीबद्दल किंवा वर्तणुकीबद्दल केली गेली पाहिजे उदा; बाळाचे मोठ्या हालचालीचे संदर्भात मैलाचे दगड, ते बाळ कुटुंबातील इतर सदस्य सदस्यांशी व सोबतच्या मित्रांची बोलण्यात उशीर करत आहे आणि अशा मुलांना ऑटिझम स्पेक्ट्रमडिस ऑर्डर अर्थातच स्वमगनता याकरीता तपासणी चाचणी करणे आवश्यक आहे.

**बोलणे आणि भाषासंदर्भात समस्या :**
बोलणे आणि भाषे संदर्भात समस्या असणेही अनेक मेंदूच्या पक्षाघात असणाऱ्या मुलांमध्ये आढळून येते आणि म्हणून बाळाच्या प्रत्येक भेटीदरम्यान त्याला ऐकायला येते की नाही, साध्या साध्या गोष्टीला तो प्रतिसाद देतो की नाही, तो इतरांशी संवाद साधतो की नाही हे तपासणे गरजेचे आहे जर त्यामध्ये उशीर आढळला तर मात्र त्याला भाषा आणि बोलणे या संदर्भात तपासणी चाचणी करणे आवश्यक आहे.


प्रश्न (५)

## माझा मुलगा व्यवस्थितपणे का जेवू शकत नाही?

मेंदूचा पक्षाघात असलेल्या मुलगा कदाचित व्यवस्थितपणे जेवू शकत नाही आणि त्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत

- चुकीचे चोखण्याची पद्धती हे सगळ्यात प्रथम लक्षण आहे मेंदूच्या पक्षाघातचे. यामध्ये बाळाची जीभ ही सारखी बाहेर असते, ओठांच्या मांसपेशींचा कमकुवतपणा किंवा सोबतच शरीराच्या अनियंत्रित हालचाली असतात. मेंदूचा पक्षाघात असलेल्या मुलांमध्ये गिळण्यासंदर्भात काही विशेष तक्रारी असतात ज्यामुळे अन्न छातीत जाऊ शकतं उदा; अति प्रमाणात गैगरी फ्लेक्स, अति प्रमाणात चावण्याचा रिफ्लेक्स, स्पर्शिका अतिसंवेदनशीलता वर दर्शविलेल्या कारणांमुळे पालकांनी संयमाने बाळाला खाऊ पिऊ घालावे, कारण इतरांपेक्षा त्याला खाण्यापिण्याचा वेळ हा जास्त लागू शकतो अगदी सुरुवातीपासूनच अशा मुलांचा आहार हा त्यांच्या वयानुसार संतुलित व उच्चप्रतीचा असावा लागतो.

चित्र क्रमांक एक आणि दोनमध्ये बाळाच्या व मुलाच्या खाण्याच्या व बसण्याच्या पद्धती दर्शविल्या आहेत.




**चित्र १ :** चुकीच्या बरोबर खाण्यापिण्याच्या पद्धती अवस्था



**चित्र २ :** जेवताना निरनिराळ्या पद्धतींचा अवलंब केला जाऊ शकतो

प्रश्न (६)

## माझ्या बाळाच्या तोंडातून सतत लाळ खूप गळते हे थांबवण्याकरता मी काय करू शकतो?

लाळ गळण्याची प्रक्रियेवर साधारणपणे १५ ते १८ महिन्याच्या असताना नियंत्रण मिळवता येतं. परंतु सतत लाळ गळणे हे वयाच्या चार वर्षानंतरदेखील जर सुरू राहत असेल हे मुख्यत्वे करून कमकुवत गिळण्याचा प्रतीक्षेप यामुळे, तसेच लाळ तयार होण्याचे प्रमाण हे जास्त असणे आणि त्यावर नियंत्रण नसणे या गोष्टीमुळे होऊ शकते. सतत तोंडातून लाळ गळत असल्याने आणि ते इतरांना दिसत असल्याने मुलाचा आत्मविश्वास कमी होतो, तसंच त्याला लोक नाव ठेवतात. त्याचप्रमाणे त्याला बोलण्यासंदर्भात अडचणी येऊ शकतात, त्याचे कपडे ओले होतात, त्याच्या सर्व वस्तू या खराब होतात आणि त्याची त्वचा ही खराब होते. चिडचिड होते. मागील भागात सलायवा अर्थातच लाळ गळणे यामध्ये बाळाची लाळ ही त्याच्या घशात जाते आणि त्यामुळे तेथून श्वास नलिकेतून फुफ्फुसात जाऊ नन्यूमोनियाचा आजार होण्याचा शक्यता असते. अशावेळी तुम्ही तुमच्या बालरोगतज्ञांना, मानसशास्त्रतज्ञांना, व्यावसायिक थेरपीस्ट किंवा सल्लागारांना दाखवून त्याचा उपचार केला पाहिजे.

**तोंडातून लाळ गळणाऱ्या मुलांना मदत करण्यासंबंधित काही महत्त्वाच्या सूचना :**

- त्याने स्वतःजवळ छोटासा रुमाल बाळगावा आणि तो हाताला गुंडाळलेला असावा
- पूर्ण तोंड व हनुवटी पुसण्यापेक्षा तिथेच ओठाजवळ टिपून घ्यावे हे त्यास शिकवावे.
- गळ्याभोवती लाळेरे लावणे हे त्या वयानुसार योग्य ठरेल.
- गोड पेय ज्यामुळे लाळेचे प्रमाण वाढतं हे शक्यतो टाळले पाहिजे तसेच तोंडामध्ये ठेवणारे काही संयंत्र याचा वापर करता येऊ शकतो.

लाळ गळणे थांबवण्याकरता जी उपचारपद्धती व धोरण आहेत त्यासंदर्भात माहीती तक्ता क्रमांक एक आणि दोन या चित्रात दिलेली आहे.

**तक्ता १ : लाळ गळण्यासंदर्भात उपचार पद्धती :**

| पुढून लाळ गळणे | मागील बाजूस घशात लाळ गळणे |
|---|---|
| • पारंपारिक<br>• ओरोमोटर व स्पर्शिका पद्धती<br>• वर्तणकीय<br>• तोंडाद्वारे वापरणारी साधने.<br>• तोंडाद्वारे देणारी औषधे.<br>• इंजेक्शन्स.<br>• शस्त्रक्रिया<br>• बालरोगतज्ञांचा सल्ला घ्यावा | • शरीराची ढब.<br>• तोंडाद्वारे औषधे.<br>• इंजेक्शन्स.<br>• शस्त्रक्रिया.<br>• रेडिओथेरपी |

**तक्ता क्रमांक २ :** लाळ गळण्यासंदर्भात उपचारपद्धती

| पुराणमतवादी उपचार पद्धती | |
|---|---|
| सोबत असलेल्या विकारांचे उपचार | • नाकपुड्यात असलेल्या अडथळ्यांचा उपचार<br>• व्यावसायिकपद्धती, जर बसण्याची ढबमध्ये अडचणी असल्यास.<br>• व्हीलचेअर अर्थातच चलखुर्चीमधे डोक्याला आधार देण्यासंदर्भात बदल करणे.<br>• संगणकाची स्क्रीन किंवा इतर उपकरणांची स्क्रीन मुलाच्या सोयीनुसार बदलवून घेणे. |
| तोंडाच्या हालचाली व लाळ गळण्यासंदर्भात मुलांना मदत करणे | • खाण्याच्या क्रिया सुधारणे.<br>• जिभेच्या व ओठांच्या हालचाली.<br>• वर्तुणकीय--- वारंवार कसे गिळणे व कसे पुसणे यासंदर्भात मार्गदर्शन करणे.<br>• व्यायाम व खेळ.<br>• विविध प्रकारच्या मुखमुद्रा.<br>• ओठांच्या हालचाली- बबब, ममम, पपप<br>• आरशाचा मुका घेणे किंवा टिशूंचे खेळ.<br>• तंतुवाद्य वाजविणे किंवा मेणबत्या भिजवणे.<br>• ओठांच्या मध्यात कागदांचा चमचा धरणे.<br>• उपकरण-- तोंड बंद किंवा ओठ व्हायब्रेटर वापरणे. |
| तोंडाच्या हालचाली गैर बदलणे. | • लक्ष दुसरीकडे देणे.<br>• हातमोजे घालणे.<br>• कडू किंवा बेचव पदार्थ ओठाला लावणे.<br>• कोपराला पट्टी बांधणे. |
| गिळण्यासंदर्भात व पूसण्यासंदर्भात प्रोत्साहन देणे ...... | • वारंवार बोलून आठवण करून देणे. त्याकरिता त्यास आरसा दाखवणे.<br>• प्रत्येकवेळी गिळल्यावर व पुसल्यावर त्याचे कौतुक करणे.<br>• स्पर्शसंकेत.<br>• दृष्टसंकेत.<br>• ऐकण्याचे संकेत उदा; अलार्म लावणे. |
| मुखाची काळजी घेणे त्याकरिता घ्यायची काळजी..... | • मुखाची निगा योग्य तऱ्हेने ठेवणे.<br>• वारंवार तज्ञांचा सल्ला घेणे.<br>• लाळेरे बांधणे किंवा योग्य ते कपडे परिधान करणे. |



**चित्र ३ :** लाळ गळणे कमी करण्याकरता वापरण्यात येणाऱ्या मुखपद्धती.

प्रश्न
(७)

## माझ्या मुलाला शौचास नीट होत नाही मी काय करू शकतो?

मेंदूचा पक्षाघात असणाऱ्या मुलांमध्ये बद्धकोष्ठता बरेचदा आढळून येते आणि याचे मुख्य कारण म्हणजे अन्नाचं कमी सेवन करणे, विशेषतः ज्यामध्ये चोथ्याचे सेवन कमी प्रमाणात केले जाते. तसेच मुलाला आसनात्मक विकृती असते. त्याचं फिरणं कमी असतं, त्यासोबतच त्याच्या मांसपेशी आखडल्या असतात.


विष्ठा/मलजित केवेळ मोठ्या आतड्यात राहील तितकी ती कडक बनत जाते म्हणूनच मुलाला अशी सवय लावावी की त्याने रोज शौचास गेले पाहिजे. तिथे त्याने पुरेसा वेळ द्यावा. कमीत कमी दहा मिनिटे त्यांनी जाऊन बसावे तसेच त्यांना आपण शिकवू शकतो की त्यांनी पोटावरच्या मांसपेशींना दाब दिल्यास शौच होण्यास मदत होते.

- उभे राहताना किंवा चालताना त्यांनी ताठ उभे रहावे, विशेषता खाताना जेणेकरून उभ्या अवस्थेमध्ये गॅस्ट्रोकॉलिक रिफ्लेक्स चांगला कार्य करतो. तसेच गुरुत्वाकर्षण प्रभावीपणे कार्य करू शकते. पंधरा मिनिटं अंघोळ किंवा खाणे केल्यास शौच्यास होण्यात मदत होते.
- संडासची सीट ही व्यवस्थित मापाची असावी व त्याला पाय टेकायची सोय. तसेच त्याच्या बाजूस पकडण्याकरता हँडल किंवा रॉड असावा, जेणेकरून बाळ पडणार नाही.
- तुम्ही तुमच्या बालरोगतज्ज्ञांना सांगून रेचक औषधे घेऊ शकता.
- आहारामध्ये चोथ्याचे प्रमाण पुरेसे असायला हवेत. चीज, दूध किंवा केळी याचे अतिसेवन टाळायला हवे.

**मुलाच्या आहारात रोज चोथ्याचे प्रमाण = वय वर्षांमध्ये + ५ ग्राम**

**शौचालय प्रशिक्षणात पालकांची कौशल्ये......**

- शौचालय प्रशिक्षणामध्ये कधी उशीर करू नये जितके लवकर करता येईल तेवढे चांगले. अर्थातच तीन ते चार वर्षाच्या आत मुलाला हे शिकवायला हवे. त्यांना कोरडे व स्वच्छ ठेवण्यासंदर्भातही शिकवावे.
- ठरलेल्या वेळेवरच मुलाला शौचालय सीटवर बसवावे.
- बक्षीस आणि प्रशंसा: टाळ्या वाजवाव्या किंवा त्याचा मुका घ्यावा जेव्हा तोही कृती व्यवस्थितपणे करत असेल व त्याला प्रोत्साहित करावे. कधीही मुलांना गोड पदार्थ किंवा चॉकलेट बक्षीस म्हणून देऊ नये.
- बाहुली किंवा कृती किंवा मॉडेल्सच्या माध्यमातून मुलांना याबद्दल शिकवावे. तसेच हातांच्या कृती तसेच हालचाली करून मुलांना शिकवावे, फक्त बोटाने दाखवू नये. किंवा बोलून दाखवू नये.
- मुलाचे कपडे व टॉयलेट सीट त्याच्या गरजेनुसार तयार करून घ्याव्यात.



चित्र ४ : शौचाची सीट मुलाच्या गरजेनुसार तयार करून दाखवण्यात आली आहे.

प्रश्न
(८)

## मेंदूचा पक्षाघात पूर्णपणे बरा होऊ शकतो का? माझ्या मुलाला कुठल्या औषधांची गरज आहे?

मेंदूचा पक्षाघात हा एक कायम स्वरूपी आजार आहे जो मुलाच्या प्रथम काही दिवसामध्ये होणाऱ्या मेंदूच्या आघातामुळे होतो. हा आजार वाढणारा नाही आणि वाढत्या वयानुसार बिकटपण होत नाही. परंतु जी लक्षणे या आजारात सुरुवातीपासून असतात ती पूर्णपणे दुरुस्त होत नाहीत. परंतु योग्य ते प्रशिक्षण व्यायाम आणि औषधी यामुळे मुलगा व्यवस्थित शिकून स्वावलंबी होऊ शकतो, जेणेकरून तो त्याच्या दैनंदिन कृती उदा; खाणे, बोलणे, शिकणे, चालणे इत्यादी स्वबळावर करून तो त्याचे जगणे सुसह्य करू शकतो.


- **पोझिशनिंग :** या आजारामध्ये सर्वात जास्त समस्या असते ती मांसपेशींच्या आकडीची किंवा लूळेपणाची, ज्यामुळे शरीराचे काही भाग अतिकडक किंवा लूळे होऊ शकतात. तसेच यामध्ये अनियंत्रित हालचाली/नको असलेल्या हालचाली होऊ शकतात. त्यामुळे मुलाला कुठेतरी दुखत असतं व तो बेचैन असतो आणि यामुळे त्याच्या दैनंदिन कृतीमध्ये आणि कार्यामध्ये फरक पडतो म्हणूनच मुलाला व्यवस्थित पोझिशनमध्ये बसवणे किंवा उभे करणे गरजेचे असते आणि या पोझिशनची कृती त्याच्यातील ताठरता कमी करण्यास मदत करते. चित्र क्रमांक ५ : मध्ये अशाप्रकारचे सर्वसाधारण पोझिशन सुचविल्या आहेत.

- **ड्रग्स किंवा औषधी :** अकड असलेल्या मांसपेशींना औषधीद्वारे विश्रांती देता येऊ शकते. ज्यामुळे त्याची पोझिशन सुधारता येऊ शकते व त्याला होणारा बेचैनी आणि आवश्यक नसलेल्या हालचालींवर नियंत्रण ठेवता येऊ शकते. पॅसिडेन, टीझानीडीन, बॅक लोफेन नावाची औषधी याकरिता वापरण्यात येतात. ही औषधी चांगल्याप्रकारे कार्य करते. जेव्हा ती त्यांच्यासोबत विशेष प्रकारचे बूट आणि भौतिक उपचार दिल्यास, एवढे करुनही जर मांसपेशींची अकड राहत असेल तर बोटुलि नियम टॉक्सिनचे इंजेक्शन हे मांसपेशींमध्ये किंवा त्यांच्या समूहामध्ये देऊन हालचालींमध्ये सुलभता आणता येते.

- **आकडी किंवा फिट्स :** जर तुमच्या मुलाला आकडी येत असेल तर त्याला आकडी विरोधात कार्य करणारी औषधी उदा; सोडियम वालप्रोएट, लिवासेटराम, फिनिटाईनक्लबस, क्लोनाझेपाम इत्यादी औषधी देऊन पुन्हा पुन्हा होणारी आकडी टाळता येते. अर्थात अशा औषधी नियमितपणे घ्याव्या लागतात आणि अशा मुलांचे वेळोवेळी तपासणी करणे आवश्यक आहे.

- मेंदूचा पक्षाघातासोबत बरेचदा मुलांच्या वर्तणूक समस्या असतात. बरेचदा ही मुलं अतिजास्त प्रमाणात हट्टी, चिडचिडी आणि जिद्दी असतात. तसेच ते आक्रमक व अतिक्रियाशील असतात. ते एकाच प्रकारचे हालचाली वारंवार करत राहतात आणि काही अतिगंभीर केसेसमध्ये ही मुलं धोक्याची लक्षणेदेखील ओळखू शकत नाहीत आणि त्यामुळे त्यांच्या अशा वागणुकींनी त्यांनाच इजा पोहचू शकते आणि अशा वागणुकीकरता काही विशिष्ट औषधे मुलांना दिली जातात. सोबतच त्यांना वर्तणूक उपचारपद्धती देखील दिल्या जातात.

- **निद्रा समस्या :** मेंदूचा पक्षाघात असणाऱ्या मुलांमध्ये बरेचदा निद्रेशी निगडित समस्या आढळतात उदा; झोप न येणे, झोपेतून दचकून उठणे, रात्रीच्या वेळेला वारंवार उठणे आणि एकंदरीतच झोपण्याची प्रत योग्य नसणे. त्यामुळे त्यांच्यामध्ये वर्तणूक समस्या आणखीन वाढतात आणि याचा परिणाम त्यांच्या दिवसभरातील कृतींवर पडतो. कधीकधी औषधांमुळेदेखील त्याचा परिणाम होतो आणि झोपण्याचा काळ व त्याची प्रत यावर त्याचा विपरीत परीणाम होतो.
- **आहार :** ज्या मुलांना खाण्यापण्याच्या समस्या वारंवार असतात अशांना एकानळीद्वारे जी नाकातून टाकली जाते पोटामध्ये. त्याद्वारे अन्न दिले जाऊन त्यांची पोषकस्थिती उत्तम केली/ठेवली जाऊ शकते.
- **बद्धकोष्ठता :** त्यांच्या आहारातील बदलासोबतच शौच पातळ होण्यासाठी किंवा मऊ होण्यासाठी रेचके दिली जातात. जेणेकरून त्यांना शौचास रोजहोईल व बद्धकोष्ठता राहणार नाही, तसेच काही मुलांमध्ये लघवीचेपण नियंत्रण व्यवस्थित नसते. ज्यामुळे वारंवार लघवी होणे, एकावेळेस पूर्ण लघवी न होणे, वारंवार लघवीचे संसर्ग होणे इत्यादी गोष्टी होऊ शकतात. परंतु वर्तणूक उपचारपद्धती तसेच जीवनशैलीमध्ये बदल आणि विविध उपचारपद्धतीमुळे, औषधांमुळे उदा; ऑक्सिब्यूटीनीनमुळे यावर मात करता येऊ शकते.




**चित्र ५ :** मेंदूचा पक्षाघात असलेल्या मुलाला कसे हाताळावे व त्याची पोझिशन कशी असावी हे दर्शविले आहे.

प्रश्न
(९)

## माझ्या मुलाचे कसे होईल तो बसू, चालू शकेल काय?

मेंदूचा पक्षाघात असलेला मुलगा बाकी इतर मुलांसारखा पूर्णपणे व्यवस्थित होणार नाही हे लक्षात असू द्यावे परंतु नाउमेद न होता खालील गोष्टीचे पालन केल्यास नक्कीच तो स्वतःच्या पायावर उभे राहू शकेल किंवा त्याला अत्यल्प मदत लागेल.

**बसण्याची व उभे राहण्याची क्षमता...**

- साधारणपणे ६०% मुलं हे कुठल्याही आधाराशिवाय चालू शकतात, दहा टक्के मुलेही एखाद्या उपकरणाची मदत घेऊन चालू शकतात परंतु या गोष्टीचे उत्तर जेव्हा मुलगा दोन वर्षाचा होईल तेव्हाच आपण सांगू शकतो. जर मुलगा दोन वर्षाचा असताना कुठलाही आधार न घेता बसू शकत असेल तर हा मुलगा सहा वर्षेपर्यंत चालायला लागेल जर दोन वर्षानंतरदेखील मुलगा बसू शकत नसेल पण लोळू शकत असेल तर हा मुलगा सहा वर्षेपर्यंत कुठलाही आधार न घेता चालण्याची शक्यता असू शकते.
- जो मुलगा चार वर्षेपर्यंत बसू शकत नाही त्याची चालण्याची शक्यता कमी असते.
- आणखीन असे काही घटक आहेत जे मुलाच्या चालण्याकरिता अवलंबून आहेत उदा; मेंदूच्या पक्षाघाताचा प्रकार. उदाहरणार्थ ज्या मुलाच्या शरीराचा संपूर्ण अर्धा भाग विकारग्रस्त असेल अशी मुले साधारण दोन वर्षानंतर चालू लागतात. साधारण पन्नास टक्के मुलं त्यांना स्पास्टिक डायपलेजीया आहे ज्यामध्ये त्यांचे दोन्ही पाय हे मोठ्या प्रमाणात अवघडले असतात. त्यांच्यामध्ये विनाआधार चालण्याचे प्रमाण उशिरा असते.
- मेंदूच्या पक्षाघाताच्या एका प्रकारात ज्यामध्ये दोन्ही हात व पायविकारग्रस्त असतात, तसेच ज्यांच्यामध्ये दृष्टीदोष असतो किंवा त्यांना सोबतच झटक्यांचा आधार असतो, ती मुले चालण्याची शक्यता कमी असते. नियमित व लवकर भौतिक उपचारपद्धती सुरू करणे, औषधाचा योग्य तो वापर करून मांसपेशीची आकडी कमी करणे तसेच चालण्याकरता आवश्यक असलेली उपकरणे वापरल्यास मुलाचे स्वतःहून पुन्हा काही आधार न घेता चालण्याची शक्यता चांगली होऊ शकते.

- बोलणे : बरीचशी मुले ही वाचा उपचार, इलेक्ट्रॉनिक बोलण्याची उपकरणांमुळे तसेच बोलणारे टाईपराईटर्स व ब्लिचसिम्बॉलमुळे बोलण्याचे कार्य चांगल्याप्रकारे पार पाडू शकतात.
- संज्ञानात्मकक्षमता : अकार्यक्षम बुद्धिमत्ताही मेंदूचा आघात असणाऱ्या अनेक मुलांमध्ये दिसून येते आणि त्यामुळे यासंदर्भातील शिक्षणपद्धतीही व्यक्तीनुरूप अवलंबून असते. काही मुले नेहमीच्या शिक्षणपद्धतीला समजून घेतात व सोबत राहतात. शिक्षणपद्धतीमध्ये थोडाफार बदल करावा लागतो जेणेकरून त्या मुलांना असे वाटले पाहिजे की ते त्या पद्धतीचा एक भाग आहे. आणि त्यांच्यामध्ये एकटेपणाने करण्याची क्षमता व विश्वास हा वाढतो आणि त्यामुळे त्यांचे सामाजिक जीवनकौशल्यपण सुधारली जातात. त्यांच्याकरिता विशेष क्लासरूम कार्यक्रम, तसेच विशेष शैक्षणिक केंद्र, छाया शिक्षक किंवा घरगुती शाळापद्धती किंवा व्यावसायिक शिक्षणपद्धतीचा अवलंब करता येऊ शकतो.
- आयुर्मान किंवा आयुष्याची अपेक्षा... ज्या मुलांना सौम्य प्रमाणात मेंदूचा पक्षाघात झाला असतो ती मुले सर्वसाधारण मुलांप्रमाणे तेवढीच वर्ष जगू शकतात. पण ज्या मुलांना तीव्र प्रमाणात हा आजार असतो त्यांचे आयुर्मान कमी असू शकते. मुलांच्या शारीरिक, कार्यात्मक, संज्ञानात्मक कृती जितक्या जास्त प्रमाणात बिघडलेली असते तितका त्याचा त्याच्या आयुर्मानावर परिणाम होतो. हालचाली संदर्भात असणारे अपंगत्व, खाण्यासंदर्भात असणाऱ्यासमस्या, झटके किंवा आकडी आणि वारंवार होणारा फुफ्फुसाचा संसर्ग यामुळे आयुर्मानावर परिणाम होऊ शकतो. परंतु एक असा प्रयत्न केला गेला पाहिजे ज्यामध्ये मुलाचे सर्वसाधारण जीवनमान हे चांगले असायला हवे आणि हे त्याच्याकृती/हालचाली वाढवून, दैनंदिन जीवनात त्याला स्वबळावर उभे करून त्याला असणारे कुठलेही दुःख किंवा बेचैनी दूर करून, त्याला योग्य प्रमाणात शिकवून, त्याच्याशी संवादसाधून, सामाजिक नाळेशी जोडून, समाजातील इतरांशी परस्पर संवाद साधून आणि सोबतच असलेल्या काही गुंतागुंतींचा व इतर आजारांचा व्यवस्थित उपचार करून आपण त्याचे जीवनमान नक्कीच सुधारू शकतो. मेंदूचा पक्षाघात असणारी बहुतांश मुलेही आनंदाने आणि इतर मुलांसारखी पूर्ण जीवन जगू शकतात जर आपण यांना या सर्व सुविधा पुरविल्या तर.

प्रश्न
(१०)

## माझ्या पुढच्या मुलालाही हा आजार होऊ शकतो काय? आणि तो होऊ नये याकरिता मी काय काळजी घ्यावी?

मेंदूचा पक्षाघात पुढील मुलाला होण्याची शक्यता कमी असते. जर पहिल्या बाळाला जनुकीय कारणामुळे किंवा आईने घेतलेल्या औषधांमुळे किंवा पहिल्या बाळाच्या मेंदूच्या विकृतीमुळे पक्षाघात झाला असेल पुढील मुलाला मेंदूचा पक्षाघात होण्याची शक्यता जास्त असते

**पुनरावृत्ती होण्यातील जोखीम घटक :** जर पहिल्या मुलांमध्ये जन्माच्यावेळेस गुंतागुंत झाली असल्यास किंवा बाळाला जन्माच्यावेळेस श्वास घ्यायला त्रास झाला असल्यास, बाळ जन्म झाल्या झाल्या न रडल्यास किंवा तो पायाळू असल्यास किंवा जन्म झाल्यावर त्याला ताबडतोब श्वास सुरू करण्यास मदत लागली असल्यास किंवा त्या बाळाला काविळीचे प्रमाण वाढून मेंदूला इजा पोहोचल्यास, त्याच्या मेंदूवर परीणाम झाला असल्यास पुढील बाळाला मेंदूचा पक्षाघात होण्याचे प्रमाण कमी राहू शकते.

मेंदूचा पक्षाघात हा मेंदूला अपघात झाला असल्यास किंवा त्याला आकडे व झटके वारंवार येऊन नियंत्रित करता येऊ न शकल्यास किंवा बाळपाण्यात बुडून मेंदूचा पक्षाघात झाला असल्यास पुढच्या बाळास मेंदूचा पक्षाघात होण्याचे प्रमाण हे नाहीच्या बरोबर असते.

**काय काळजी घ्यावी**

- पहिल्या बाळाच्या मेंदूचा पक्षाघात कशामुळे झाला याचे निदान झाले असले पाहिजे.
- प्रसूतीपूर्व तपासणी नियमितपणे करावी.
- बाळाचा जन्म होताना विशेष काळजी घ्यावी. जन्म झाल्यानंतर कमी दिवसांच्या बाळावर योग्य तो उपचार करावा आणि गरज वाटल्यास ताबडतो बनव जात संजीवनी पद्धतीचा अवलंब करावा, जेणेकरून बाळाच्या मेंदूला इजा पोचणार नाही.